आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२१ मार्च २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- वंचित बहुजन आघाडी, समाजवादी पक्ष, माकपासोबत महाविकास आघाडीची जागा वाटपाची चर्चा
- केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीबाबत नवीन कायद्याला स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार
- पतंजलीच्या जाहिरातींमधून ग्राहकांची दिशाभूल केल्याप्रकरणी आचार्य बाळकृष्ण यांच्यांकडून सर्वोच्च न्यायालयात बिनशर्त माफी

**आणि**

- अमेरिकन फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कपातीच्या संकेतांमुळं सोन्याचे दर नव्या उच्चांकावर, शेअर बाजारातही तेजी

**<><><><><>**

महाविकास आघाडीची जागा वाटपावर चर्चा झाली असून वंचित बहुजन आघाडी, समाजवादी पक्ष, माकपा या मित्रपक्षांशी बोलणी झालेली आहेत, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज सांगितल. काँग्रेस पक्षाचे उमेदवारही जवळपास निश्चित झाले असून जागावाटप आणि उमेदवार दोन-तीन दिवसात जाहीर होतील, असं ते म्हणाले. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशी आज सकाळी चर्चा झाली. शिवसेनेकडून खासदार संजय राऊतही यावेळी उपस्थित होते. वंचित बहुजन आघाडीशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बोलणी

केली. जागा वाटपाबरोबर प्रचार सभा आणि इतर मुद्द्यांवरही यावेळी चर्चा झाल्याचं पटोले यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात महायुतीमध्ये जागावाटपाबद्दलची चर्चा आता अंतिम टप्प्यात असून योग्य वेळ आल्याबरोबर निर्णय घोषित केला जाईल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यां‍ंनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. राज्यात महायुतीच्या अधिकाधिक जागा निवडून याव्यात यासाठीचा आढावा आज शिवसेनेच्या आढावा बैठकीत घेण्यात आल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या पत्रसूचना कार्यालयाअंतर्गत फॅक्टचेक कक्ष स्थापन करणाऱ्या अधिसूचनेला सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली आहे. अफवा रोखण्यासाठी केंद्रसरकारच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने फॅक्टचेक कक्षाची स्थापना केली होती. त्याला आव्हान देणारी याचिका विनोदवीर कुणाल कामरा आणि एडिटर्स गिल्ड ऑफ इंडिया ने मुंबई उच्च न्यायलयात दाखल केली आहे. सुनावणी पूर्ण होईपर्यंत या अधिसूचनेला स्थगिती देण्याची मागणी याचिकेत केली होती ती उच्च न्यायलयाने ११ मार्च रोजी नाकारली. त्याविरुद्ध याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील पीठाने हे प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित असेपर्यंत अधिसूचनेला स्थगिती दिली.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीबाबत नवीन कायद्याला स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. या कायद्याच्या आधारे ज्ञानेश

कुमार आणि सुखबीर सिंग संधू या दोन निवडणूक आयुक्तांची नेमणूक झाल्यानंतर त्याला आव्हान देणारी याचिका दाखल झाली होती. ती न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्त यांच्या खंडपीठाने फेटाळली. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर या कायद्याच्या अंमलबजावणीला स्थगिती देता येणार नाही असं न्यायालयाने स्पष्ट केलं.

**<><><><><>**

पतंजली कंपनीच्या उत्पादनांच्या जाहिरातींमधून ग्राहकांची दिशाभूल करणारे दावे केल्या प्रकरणी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण यांनी आज सर्वोच्च न्यायालयात बिनशर्त माफी मागितली. न्यायालयानं पतंजलीचे संस्थापक रामदेव बाबा आणि आचार्य बाळकृष्ण यांना २ एप्रिल रोजी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर कंपनीनं आज या प्रकरणी बिनशर्त माफीचं प्रतिज्ञापत्र सादर केलं. भविष्यात अशा जाहिराती दिल्या जाणार नाहीत याची खबरदारी घेतली जाईल असं यात म्हटलं आहे.

गेल्या २७ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयानं पतंजली आयुर्वेद कंपनीच्या रक्तदाब, मधुमेह, संधिवात, दमा आणि लठ्ठपणा यांसारख्या आजारांवरच्या औषधांच्या जाहिरातींवर बंदी घातली होती. न्यायालयानं पतंजली आयुर्वेद आणि आचार्य बाळकृष्ण यांच्याविरुद्ध अवमानाची नोटीसही बजावली आहे.

**<><><><><>**

अमेरिकन फेडरल रिझर्व्हने व्याजदरात कपात करण्याचे संकेत दिल्यानं सोन्याच्या दरांनं नवा उच्चांक गाठला आहे. २४ कॅरेट सोन्याचे दर कालच्या तुलनेत सुमारे साडे बाराशे रुपयांनी वधारून आज ६७ हजारांच्या जवळ पोहोचले.

चांदीचे दरात दिवसभरात दीडहजार रुपयांची वाढ झाली आणि चांदी ७५ हजार रुपयांच्या पलीकडे गेली. याविषयी सराफ बाजार तज्ञ अमित मोडक म्हणाले.

**होल्ड - अमित मोडक**

फेडरल रिझर्व्हनं व्याजदर कपात करण्याचा निर्णय घेतला त्याचा सकारात्मक परिणाम देशातल्या शेअर बाजारांवरही झाला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ५४० अंकांची वाढ झाली, आणि तो ७२ हजार ६४१अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १७३ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार १२ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

वसंत ऋतूच्या आगमनाची चाहूल आणि आंब्या-काजूच्या बागांमधल्या मोहराचा सुगंध भरून राहिलेल्या रत्नागिरी जिल्ह्यात, सध्या गावोगावी एका वेगळ्याच उत्साहाचं वातावरण आहे. पारंपरिक शिमगोत्सव हे त्या उत्साहाचं कारण. त्याविषयी ऐकूया आमच्या वार्ताहराकडून…

**होल्ड - बाईट - अनिकेत कोनकर**

**<><><><><>**

‘होळी’सणाच्या कालावधीत कोणत्याही प्रकाराची वृक्षतोड करू नये, असं आवाहन मुंबई महापालिकेनं केलं आहे. अनधिकृत वृक्षतोड करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई होणार असून शिक्षेत कैदेचीही तरतूद केली आहे. ‘होळी’च्या कालावधीत वृक्षतोड होत असल्याचं आढळलं तर सतर्क नागरिकांनी बृहन्मुंबई महानगरपालिका अधिकाऱ्यांना आणि स्थानिक पोलिस ठाण्याला कळवावं. तसंच महानगरपालिकेच्या '१९१६' या 'टोल फ्री' क्रमांकावर संपर्क साधावा, असं पालिकेनं सांगितलं आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सिंधुदुर्ग जिल्ह्यात बांदा चेक नाक्यावर बेकायदा दारू वाहतुकीच्या विरोधात पोलिसांनी आज कारवाई केली. या कारवाईत १९ लाख रुपयांहून अधिक किमतीची दारू आणि सुमारे १० लाख रुपये किमतीचा ट्रक असा मुद्देमाल जप्त केला. पोलीसांनी या प्रकरणात आंध्र प्रदेशातल्या दोघांना ताब्यात घेतलं आहे. वाशिम जिल्ह्यातही वाशिम, मंगरूळपीर आणि कारंजा या उपविभागात पोलीसांनी दारूबंदी आणि शस्त्रबंदी अधिनियमांतर्गत एकाचवेळी कारवाई करत ६ लाखांहून अधिक किमतीचा अवैध मुद्देमाल जप्त केला.

<><><><><>

निवडणूक काळातील पैशांचे गैरव्यवहार रोखण्यासाठी आयकर विभागानं◌ं मुंबईत एक चोवीस तास कार्यरत राहणारा कक्ष स्थापन केला आहे. या संदर्भातील तक्रारींसाठी नागरिक या कक्षाच्या क्रमांकावर तक्रार करु शकतील. या तक्रारींसाठी १८००-२२१-५१ हा टोल फ्रि क्रमांक देण्यात आला असून ८९७६१७६२७६ किंवा ८९७६१७६७७६ या क्रमांकावर व्हॉटसअप किंवा मेसेज पाठवूनही आपली तक्रार दाखल करता येणार आहे.

<><><><><>

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सिंधुदुर्ग जिल्ह्यात निवडणूक आयोग मतदान जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबवत आहे. या अंतर्गत कुडाळ तहसील कार्यालयात आज ‘माझं मत माझा अधिकार आणि मी मतदान करणार’ असं लिहिलेल्या फलकावर प्रांत अधिकारी आणि तहसीलदार यांनी स्वाक्षरी करून स्वाक्षरी मोहीम सुरु केली. तसंच या ठिकाणी मतदारांसाठी सेल्फी पॉईंट देखील उभरण्यात आला आहे. दिव्यांग आणि ८० वर्षावरच्या मतदारांना १२-डी फॉर्म

भरून घरात बसून मतदान करण्याची सोय देखील उपलब्ध करण्यात आली. निवडणूक शाखेचे कर्मचारी घरोघरी जाऊन मतदारांमध्ये जनजागृती करत आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रीय वरिष्ठ गट कबड्डी स्पर्धा आजपासून अहमदनगरच्या वाडिया पार्क मैदानावर सुरू झाली. संध्याकाळी अर्जुन पुरस्कार विजेते कबड्डी खेळाडू अशोक शिंदे, आतंरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू तुषार आरोटे यांच्या हस्ते या स्पर्धेचं उद्घाटन झालं.

चार दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत देशभरातले ३० संघ सहभागी झाले आहेत. सलामीला महाराष्ट्र विरूद्ध गुजरात, बीएसएनल विरूध्द भारतीय रेल्वे, गोवा विरुद्ध पश्चिम बंगाल, हरियाणा विरूद्ध उत्तराखंड यांच्यात सामने सुरू करण्यात आले.

**//<><><><><>//**